# महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाइडस्

७९ एफ रोड मरिन ड्राईव्ह, मुंबई - ४०००२०

दिनांक : 19 JUN 2026

जा.क्र.भास्कागा/प्रशासन/का.०१/२०२५-२६/६६८

प्रति,

सर्व राज्य कार्यकारी समिती सभासद,
महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस्

**राज्य कार्यकारी समिती सभा सूचना**

**महोदय/महोदया,**

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् संस्थेची राज्य कार्यकारी समितीची सभा दि. २४.०६.२०२६ रोजी वार बुधवार सकाळी ११.०० वा ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**(टिपणी मा. आयुक्त तथा राज्य मुख्य आयुक्त यांच्या मान्यतेने)**

आपला,

(मिलिंद दिक्षित)
राज्य चिटणीस(अ.का.)
तथा सहाय्यक संचालक,क्रीयुसे,पुणे.

**सभेपुढील विषय**

विषय क्र. १:- मागील दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी संपन्न झालेल्या राज्य कार्यकारी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

विषय क्र. २:- मागील सभेतील घेतलेल्या निर्णयांवरील कार्यवाहीचा अहवाल ( Action Taken Report ) सादर करुन विचार विनिमय करणे.

विषय क्र. ३:- राज्य मंडळ सभा निश्चित करण्याकरिता मा. अध्यक्षांशी विचार विनिमय करुन दिनांक, वेळ व स्थळ निश्चित करणे.

विषय क्र. ४ :- सन २०१९-२० ते सन २०२४-२५ या वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल यावर विचार विनिमय करुन राज्य मंडळास मंजूरीस्तव शिफारस करणे.

विषय क्र.५:- सन २०२५-२६ लेखा परिक्षणाकरिता सनदी लेखा परिक्षकाची नियुक्ती पुढील ५ वर्षाकरिता करणे.

विषय क्र. ६:- सन २०२६-२७ च्या अंदाज पत्रकावर विचार विनिमय करुन राज्य मंडळास मंजूरीस्तव शिफारस करणे.

विषय क्र. ७ :-राष्ट्रीय कार्यालयाकडून प्राप्त राज्य उपनियमाचे मराठीत अनुवाद केलेल्या उपनियमाबाबत विचार विनिमय करुन त्यास राज्य मंडळास मंजूरीस्तव शिफारस करणे.

विषय क्र. ८:- जिल्हा / स्थानिक संस्था उपनियम राज्य संस्थेच्या उपनियमाच्या धर्तीवर मराठी भाषेत तयार केलेल्या उपनियमास राज्य मंडळ सभेस मंजूरीस्तव शिफारस करणे.

विषय क्र. ९ :- राष्ट्रीय पुस्तिकेतील नियम क्र. ६९ (१) नुसार मा. राज्य कोषाध्यक्षाची नियुक्ती करणे.

विषय क्र. १०:- कर्मचारी CPF मधून अग्रीम/ परतावा व नापरतावा कर्ज रक्कम वाटप संदर्भात विचार विमिनय करुन ठराव घेणे.

विषय क्र ११: - सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी जमा रक्कमेस अदाईस मंजूरी देणे.

विषय क्र.१२:- सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना देय रजा रोखीकरण रक्कम अदाईस मंजूरी देणे.

विषय क्र.१३:- आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपदान निधी नियम १९७२ नुसार देय रक्कम शासनाकडून मंजूर करुन घेण्याकरिता विचार विनिमय करणे.

विषय क्र.१४: -माहे नोव्हेंबर,२००५ नंतर DCPS खाते NPS या योजनेमध्ये समावेश करणे तसेच कर्मचा-यांचे दि. १९/०८/२०१९ च्या शासन निर्णयनुसार १४ टक्के संस्थेचा समभाग रक्कम त्यात जमा करणेकरीता विचार विनिमय करुन शिफारस करणे.

विषय क्र.१५:-सन २०२६- २७ च्या राज्य मुख्यालय,साहित्य भांडार व पॅव्हिलियनच्या अंदाजपत्रकावर विचार विनिमय करुन राज्य मंडळास मंजूरीस्तव शिफारस करणे.

विषय क्र.१६:-सन २०२४ - २५ च्या राज्य मुख्यालय ,साहित्य भांडार व पॅव्हिलियनच्या तेरीज पत्रक ताळेबंदावर विचार विनिमय करणे तसेच सन २०२४-२५ या वर्षातील झालेल्या खर्चास मान्यता देऊन राज्य मंडळास मंजूरीस्तव शिफारस करणे.

विषय क्र.१७: - राष्ट्रीय कार्यालयाकडून मागणी केलेले साहित्य राज्य संस्थेचा विक्रीकरिता दर निश्चित करणे.

विषय क्र.१८:-राष्ट्रीय नियम पुस्तिकेतील नियम क्रमांक ( ८१.७ ) नुसार मा.राज्य मुख्य आयुक्त यांच्या शिफारसी वरुन ०७ विश्वस्तांची समिती स्थापन करणे. (ज्यामध्ये राज्य मुख्य आयुक्त तसेच वयाने जेष्ठ असलेले स्काऊट विभागातील एक राज्य आयुक्त व गाईड विभागातील एक राज्य आयुक्त असे तीन पदसिध्द विश्वस्त सदस्य असतील आणि उर्वरित चार सदस्यांची नियुक्ती करणे).

विषय क्र.१९: -राष्ट्रीय कार्यालयाच्या नियम पुस्तिकेतील नियम क्रमांक ७७ नुसार राज्य अर्थ समिती गठीत करणे. मा. राज्य मुख्य आयुक्त, हे राज्य कार्यकारी समितीत सल्लामसलत करून वित्त व लेखा विभागातील तज्ञ असलेल्या ५ सदस्यांना अर्थ समितीचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करतील. या समितीचे सचिव राज्य चिटणीस असतील.

विषय क्र. २०:-राष्ट्रीय कार्यालयाच्या नियम पुस्तिकेतील नियम क्र. (६७.२) नुसार सर्व राज्य आयुक्त (एकूण ०८) तसेच नियम क्र. (६७.३) सर्व राज्य मुख्यालय आयुक्त (स्काऊट विभागातून- ४) व ( गाईड विभागातून- ४) यांची नियुक्त करण्याचे अधिकार मा.राज्य मुख्य आयुक्त यांना आहेत. मा. राज्य मुख्य आयुक्त, राज्य कार्यकारी समितीत सल्लामसलत करून सदस्य नामनिर्देशित करतील.

विषय क्र.२१: -राष्ट्रीय कार्यालयाच्या नियम पुस्तिकेतील नियम क्र. (७७,८३,८४,८५,८६) नुसार राज्य कार्यकारी समिती सभेत समित्या गठीत करणे बाबत. (एकूण ०५)

विषय क्र. २२ - मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

(मिलिंद दिक्षित)
राज्य चिटणीस(अ.का.)
तथा सहाय्यक संचालक,क्रीयुसे,पुणे.

**प्रत:-** राज्य संस्थेचे सर्व अधिकारी - यांना सुचित करण्यात येते की ,त्यांनी सर्व सभांना संपुर्ण तयारी निशी व आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित रहावे.

**टिप:** नियम क्र(८२.३ व ८२.४) जर सभेच्या नेमलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाच्या आत गणपूर्ती नसेल तर सदर सभा निश्चित वेळेपासून एक तासाकरीता तहकूब केली जाईल आणि ही सभा पून्हा त्याच ठिकाणी घेतली जाईल.